# गोवा शिपयार्ड, बिट्स इनोव्हेशन सोसायटीत सामंजस्य करार



**वास्को : सामंजस्य कराराप्रसंगी गोवा शिपयार्डचे सरव्यवस्थापक पी. रवींद्रन व बिट्सतर्फे बीजीआयईएसचे अध्यक्ष प्रा. सुमन कुंडू.**

**वास्को प्रतिनिधी :** गोवा शिपयार्ड लिमिटेड आणि बिट्स गोवा इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲण्ड एंटरप्रेन्युअरशिप सोसायटी एकत्र आले आहेत. तंत्रज्ञान विकास, जहाजबांधणी आणि संरक्षण उद्योगात विकास घडवून आणण्यासाठी गोवा शिपयार्ड व बिट्स गोवा इनोव्हेशन इनक्युबेशन ॲण्ड एंटरप्रेन्युअरशिप सोसायटी यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे बिट्स गोवाचे संशोधन कौशल्य आणि गोवा शिपयार्डच्या जहाजबांधणी आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अनुभव एकत्र आला आहे. सामंजस्य करारांतर्गत दोन्ही संस्था पुढील एक वर्षात जहाजबांधणी आणि संरक्षण क्षमतेच्या विकासासाठी कार्यरत राहतील. सामंजस्य करारावेळी गोवा शिपयार्डचे सरव्यवस्थापक (उत्पादन) पी. रवींद्रन तर बिट्सतर्फे बीजीआयईएसचे अध्यक्ष प्रा. सुमन कुंडू यांनी प्रतिनिधीत्व केले.